MHPA110002972025

**नियमित दिवाणी दावा क्रं.१४०/२०२५**

**दिपक वडकर विरूद्ध राधाबाई वगैरे**

**निशाणी क्रं.३२ खालील आदेश**

१. अर्ज व म्हणणे पाहिले.

२. उभय पक्षकारांतर्फे विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला.

३. वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ आदेश १ नियम १० अन्वये अर्ज दाखल करून उप–अधीक्षक भूमी अभिलेख कार्याीलय, सोनपेठ, जिल्हा परभणी यांना या दाव्याच्या कामी प्रतिवादी क्रं.७ म्हणून नेमण्याची विनंती केली आहे. त्यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्रं.६ यांनी त्यांच्या नावे असलेल्या १ हेक्टर ९६ आर या जमिनीची मोजणी करणेसाठी अर्ज दिला असून प्रतिवादी क्रं.६ हे बळजबरीने वादीला दमदाटी करून मोजणी करण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि पोलीस प्रशासनामार्फत वादीवर दबाव टाकत आहेत. त्यामुळे भूमी अभिलेख कार्यालय सोनपेठ जिल्हा परभणी यांना या दाव्याच्या कामी प्रतिवादी म्हणून समाविष्ट करणे आवश्यक आहे.

४. प्रतिवादींनी या मागणीस आक्षेप घेतला असून सदर मागणी ही दाव्यातील मागणीशी संबंधित नाही आणि वादी हे नवीन कारण उपस्थित करून पक्षकार समाविष्ट करण्याची दाद मागत आहेत असा उजर घेतला आहे. या दाव्याच्या कामी निशाणी क्रं.५ वरील अर्जावर उभय पक्षकारांतर्फे युक्तिवाद झालेला असून कोणत्याही कार्यवाहीचा अवलंब न करता दिलेला हा अर्ज नामंजूर होण्याची त्यांनी विनंती केली आहे.

५. वादीने हा दावा प्रतिवादी क्रं.१ ते ६ यांच्याविरुद्ध दावा मिळकतींची सरसनिरस मानाने वाटप होऊन त्यांच्या हिश्याचा स्वतंत्र ताबा मिळणे बाबत हक्क ज्ञापनाबाबत दाखल केलेला आहे. या कामी वादीतर्फे दाखल निशाणी क्रं.५ वरील अर्जावर उभय पक्षकारांतर्फे युक्तिवाद झाल्यानंतर प्रस्तुत अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. या ठिकाणी नमूद करण्याजोगी बाब म्हणजे वादीने या दाव्याच्या कामी प्रतिवादी क्रं.७ म्हणून दुय्यम निबंधक, विटा रोड, सोनपेठ तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी यांना यापूर्वीच समाविष्ट केले आहे. या दाव्याच्या कामी प्रतिवादी म्हणून समाविष्ट करण्याकरीता प्रस्तावित प्रतिवादी क्रं. ७ उपभूमी अधीक्षक कार्यालय सोनपेठ हे दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ आदेश १ नियम १० अन्वये आवश्यक किंवा योग्य पक्षकार असणे आवश्यक आहे. सदरची आवश्यकता व योग्यता ही दाव्यामध्ये मागणी केलेली दाद बाबत संदर्भित आहे. म्हणजेच वादीने दाव्यात मागितलेली दाद बाबत ठरवित असताना प्रस्तावित प्रतिवादीची

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by RUPALI RAJANIKANT BEDAGKAR
Date: 2025.12.19 17:47:02 +0530

उपस्थिती न्यायालयासमोर आवश्यक आहे. अर्जातील मजकूर पाहता प्रस्तावित प्रतिवादी यांची या दाव्याच्या कामी उपस्थिती आवश्यक नाही असे माझे मत आहे. सबब अर्ज मंजुरीस पात्र नसल्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**–: :– आदेश –: :–**

१. वादीचा निशाणी क्रं.३२ वरील अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येतो.

**(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर.)**

Digitally signed by RUPALI RAJANIKANT BEDAGKAR
Date: 2025.12.19 17:47:10 +0530

(श्रीमती आर.आर.बेडगकर)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
गंगाखेड

दिनांक : १९/१२/२०२५